# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.12.2024** **वारःशनिवार**

1. संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, एक देश-एक निवडणूक संदर्भातली विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे.
2. परभणी आणि बीड हिंसाचार प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत घोषणा.
3. शासकीय अधिकाऱ्यांसाठीच्या पहिल्या मराठी साहित्य संमेलनाचं पुण्यात आज उद्घाटन.
4. गडचिरोली जिल्ह्यात दोन जहाल नक्षलवाद्यांची पोलिसांपुढे शरणागती. आणि
5. ताम्हिणी घाटात बस अपघातात 5 जणांचा मृत्यू, मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून प्रत्येकी 5 लाख रुपयांची मदत जाहीर.

**संसद**

संसदेचं हिवाळी अधिवेशन काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. तत्पूर्वी लोकसभेचं काम सुरू होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ गदारोळ केला. सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना नियमांचं पालन करण्याचं आणि संसद भवनाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन न करण्याचं आवाहन केलं. त्यानंतर एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली 2 विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी गोंधळातच मांडला. या समितीमध्ये लोकसभेचे 27 आणि राज्यसभेचे 12 सदस्य आहेत. यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा ओम बिर्ला यांनी केली. राज्यसभेतही विविध मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज आधी 12 वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. त्यानंतर एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करत असल्याची घोषणा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी केली.

**विधिमंडळ-मुंबई**

बीड आणि परभणी इथं गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटनांची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केली. या प्रकरणी विरोधकांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला ते उत्तर देत होते.

परभणीतली घटना कोणत्याही समुदायांमधल्या वैरभावनेतून झाली नाही, असं ते म्हणाले. या प्रकरणात अटकेत असलेले सोमनाथ सूर्यवंशी यांना श्वसनाचा दुर्धर आजार होता, असं सांगून, सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला 10 लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली. तसंच या घटनेनंतर मृत्यू झालेले आंबेडकरवादी कार्यकर्ते विजय वाकोडे यांनी या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असं सांगून, त्यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली. या प्रकरणी अतिरिक्त बळाचा वापर करणाऱ्या पोलीस निरीक्षक अशोक घोडबांड यांना निलंबित करून त्यांची चौकशी केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण तेवढ्यापुरतं मर्यादित नसून याची पाळंमुळं खोदावी लागतील, असं फडणवीस यांनी सांगितलं. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना 10 लाख रुपये मदत देण्याची घोषणा त्यांनी केली. बीड जिल्ह्यात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले. या प्रकरणाची चौकशी दोन प्रकारे केली जाईल. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या अंतर्गत विशेष तपास समिती, तसंच न्यायालयीन चौकशीही केली जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणात पोलीस प्रशासनाची भूमिका कुचराईची असून, बीडच्या पोलीस अधिक्षकांची बदली करणार असल्याचं फडणवीस यांनी सभागृहाला सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या या उत्तरानं समाधान न झाल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला.

कल्याणमधे योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला मारहाण झाल्याच्या प्रकरणाची राज्य शासनानं गंभीर दखल घेतली असून दोषींवर गुन्हा दाखल करून कारवाई सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. मारहाण प्रकरणात दोषींवर तातडीनं कारवाई केली जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सांगितलं. कल्याणमधल्या सोसायटीत मराठी कुटुंबाच्या बाबतीत झालेल्या घटनेत शिवसेना मराठी कुटुंबाच्या पाठीशी ठाम असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नागपुरात वार्ताहर परिषदेत सांगितलं.

विधानसभेत मंजूर झालेलं महाराष्ट्र मुद्रांक दुरुस्ती विधेयक 2024 तसंच, मूल्यवर्धित कर दुरुस्ती आणि विधीग्राहीकरण विधेयक 2024 काल विधान परिषदेत मंजूर करण्यात आलं.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं 2025च्या हंगामासाठी सुक्या खोबऱ्याच्या किमान आधारभूत किमतीला मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांना याबाबत माहिती दिली. केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले असल्याचं ते म्हणाले. घाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या खोबऱ्यासाठी 11 हजार 582 रुपये प्रति क्विंटल आणि गोटा खोबऱ्यासाठी 12 हजार 100 रुपये प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर 855 कोटी रुपयांचा भार पडणार आहे.

**<u>शासकीय अधिकारी साहित्य संमेलन</u>**

पुणे महापालिकेची मराठी भाषा संवर्धन समिती आणि संवाद, पुणे यांनी संयुक्तपणे पुण्यात पहिलं राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन आयोजित केलं आहे. त्या अनुषंगानं शासकीय अधिकाऱ्यांनी साकारलेल्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचं उद्घाटन काल झालं. आज साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त राजू नंदकर म्हणाले........

**<u>बालरंगभूमी</u>**

पुण्यातील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात कालपासून पहिल्या बालरंगभूमी संमेलनाची सुरुवात झाली. शोभायात्रेने या संमेलनाचा प्रारंभ झाला. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा निलीम शिर्के-सामंत यांच्यासह अनेक मान्यवर आणि बालप्रेक्षकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने हजेरी लावली. संमेलनाध्यक्ष नटवर्य मोहन जोशी यांच्या हस्ते संमेलन प्रवेशद्वाराचे औपचारिक उदघाटन करण्यात आले. बालरंगभूमी परिषदेचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>पोलिस-नाशिक</u>**

नाशिक इथल्या महाराष्ट्र पोलीस अकादमीचा 124 वा दीक्षांत सोहळा काल नाशिकचे प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांच्या उपस्थीतीत पार पडला. यावेळी एकंदर 620 उपनिरीक्षकांची तुकडी पोलीस दलात सामिल झाली.

**पोलिस**

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी नेहमीच उपयुक्त ठरत असतात. अशाच एका योजनेचा लाभ घेऊन पाच अनाथ उमेदवारांनी पोलीस उपनिरीक्षकपदाला गवसणी घातली आहे..... ऐकुया अधिक वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून.....

**अनाथ वंचित मुलांना बालगृहातून बाहेर पडल्यानंतर उदरनिर्वाहासाठी अनेकदा संघर्ष करावा लागतो. अशा अनाथ मुला मुलींसाठी सर्व शासकीय सेवांच्या भरतीत एक टक्का आरक्षण ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारनं 2014 मध्ये घेतला. याच योजनेचा लाभ घेत पाच अनाथ युवक-युवतींची नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीतून पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली आहे. सिंधुदुर्गचे अभय तेली, धाराशिवचे सुधीर चौगुले, सातार्‍याचे अमोल मांडवे, पुण्यातील एस. बी. सुंदरी आणि नागपूरच्या जया सोनटक्के यांनी हे यश मिळवलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी नाशिकहून संजय पाठक यांच्यासह माधवी कुलकर्णी पुणे.**

**कृषीपर्यटन**

सोलापूर जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाबरोबरच कृषी पर्यटनासाठी आता प्रयत्न करण्यात येत आहेत. याबाबत जिल्हा पर्यटन अधिकारी अमृत नाटेकर यांनी आकाशवाणीशी बोलताना अधिक माहिती दिली. ते म्हणाले....

**नक्षल शरण-गडचिरोली**

गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आणि 8 लाखांचे बक्षीस असलेल्या दोन जहाल नक्षल्यांनी काल गडचिरोली जिल्हा पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे शरणागती पत्करली. रामसू दुर्गू पोयाम उर्फ नरसिंग आणि रमेश शामू कुंजाम उर्फ गोविंद उर्फ रोहित अशी या नक्षल्यांची नावे आहेत. 2005 मध्ये आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत 680 नक्षल्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**निधन-नाशिक**

नाशिक येथील दैनिक देशदुतचे संस्थापक आणि उद्योजक देवकिसन सारडा यांचे काल निधन झाले ते 92 वर्षांचे होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नाशिक जिल्हा सहकारी बँक आदि संस्थांवर त्यांनी कार्य केलं आहे. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे.

**अपघात**

रायगड जिल्ह्यात ताम्हिणी घाटात काल सकाळी एका खाजगी बसला झालेल्या भीषण अपघातात 5 जणांचा मृत्यू झाला तर 17 जण जखमी झाले आहेत. वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. जखमींवर माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या बसमध्ये सुमारे 40 प्रवासी प्रवास करत होते. ही बस पुण्याहून महाडकडे लग्नाचे वऱ्हाड घेऊन चालली होती. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी जाहीर केलं आहे.

**हवामान**

राज्यात हवामान सर्वत्र कोरडं राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**